**महाराष्ट्र शासन**
**ग्राम विकास व जलसंधारण विभाग**
शासन निर्णय क्रमांक व्हिपीएम २६१०/प्र.क्र.१/पंरा-४
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२
**दिनांक : १८ ऑगस्ट , २०१०**

**प्रस्तावना :-**

महाराष्ट्र राज्य स्थापनेच्या सुवर्ण महोत्सवी वर्षाच्या निमित्ताने राज्यातील गावांचा शाश्वत विकास **(Sustainable Village Development)** घडवून आणण्याकरीता ग्रामविकासाची दिशा ठरविण्याची गरज आहे. यासाठी शासनाने राज्यात ग्रामोत्थानाचा **त्रिसूत्री** कार्यक्रम राबविण्याचे ठरविले असून त्यात १) उच्चप्रतिच्या भौतिक, मूलभूत सुविधा २) दर्जेदार सामाजिक मूलभूत सुविधा व ३) मूल्यवर्धित स्थानिक रोजगार व स्वयं-रोजगार निर्मिती ही त्यांची तीन सुत्रे आहेत त्यापैकी **लोक सहभागातून शासन सहकार्याने उच्चप्रतीच्या मुलभूत सुविधांचा** हा कार्यक्रम आहे.

परंतु गावात अशा उच्च प्रतीच्या भौतिक सुविधांची निर्मिती करुन जीवनमान उंचावतांनाच त्यासाठी लागणाऱ्या नैसर्गिक साधन संपत्तीचा विनियोग **पर्यावरणाचा समतोल** राखून कसा करता येईल याचा प्राथम्याने विचार झाला पाहिजे. भारतीय राज्य घटनेच्या अनुच्छेद **४८-अ** नुसार पर्यावरण रक्षण ही शासनाची जबाबदारी आहे, तशीच अनुच्छेद **५१-अ** प्रमाणे पर्यावरण संतुलन राखणे व शास्त्रीय वृत्ती विकसीत करणे ही नागरीकांची मूलभूत कर्तव्ये सुध्दा आहेत. दिवसेंदिवस लोकसंख्या वाढत असून नैसर्गिक साधन संपत्तीचा ऱ्हास होत आहे, त्यामुळे वैश्वीक उष्मीकरणासारखे **(Global Warming )** अनेक विषय मूळ धरु पाहत आहेत. **पर्यावरणाचे संवर्धन, जतन व संरक्षण करुनच समृध्द व संपन्न गांवाची निर्मिती** ही काळाची गरज आहे. यासाठी जल, जमीन, जंगल, हवा, वनस्पती यांचे योग्य व्यवस्थापन करुन भौतिक सोयी सुविधाची निर्मिती पर्यावरण संतुलन राखून केल्यास ग्रामस्थांचा जीवनमान दर्जा **(Quality Life)** सुधारण्यास निश्चित मदत होईल.

ग्रामस्तरावर शासनाच्या विविध विभागांमार्फत जे कार्यक्रम राबविले जात आहेत, त्यामध्ये **ग्रामस्थांचा लोकसहभाग** अतिशय महत्त्वाचा आहे. ग्रामपातळीवर नियोजन करुन अंमलबजावणी केल्यास पर्यावरण संतुलित गाव निर्माण झाल्यावर त्यांचे सातत्यही टिकविता येईल. यासाठी ज्या ग्रामपंचायती पर्यावरण संतुलीत गाव करण्यासाठी पावले उचलतील त्या ग्रामपंचायतींना तांत्रिक व प्रशासकीय पाठबळ आणि आर्थिक प्रोत्साहन देवून, त्याद्वारे गावातील सार्वजनिक, सामुहिक व कौटुंबिक मूलभूत भौतिक सुविधा व जीवनावश्यक साधने पर्यावरण केंद्रीत कार्यक्रम घेऊन विकसीत करण्याची गरज आहे,

तसेच राज्यातील एकूण २७,९२० ग्रामपंचायतींपैकी सन २००१ च्या जनगणनेनुसार ३८९ ग्रामपंचायतींची लोकसंख्या १०,००० पेक्षा जास्त आहे. यापैकी काही ग्रामपंचायतींची लोकसंख्या ५०,००० पर्यंत आहे. १३२६ ग्रामपंचायतींची लोकसंख्या ५००० ते १०,००० च्या दरम्यान आहे. या गावांची लोकसंख्या एवढी जास्त असूनही नागरी स्थानिक स्वराज्य संस्था स्थापन होऊ न शकण्याचे एक महत्वाचे कारण असे आहे की, याठिकाणी अकृषिक रोजगार व वाणिज्यिक व्यवहाराची टक्केवारी ५० टक्क्यांपेक्षा कमी आहे. परंतु या ग्रामपंचायतीच्या लोकसंख्येचा विचार करता यापैकी अनेक गांवे परिसरासाठी विकास केंद्रे (Growth Centre) म्हणून विकसित होवू शकतात. यासाठी या मोठया ग्रामपंचायतींचा आर्थिक, सामाजिक, सांस्कृतिक, औद्योगिक, कृषी औद्योगिक आणि वाणिज्यिक विकास करावा लागेल. त्यासाठी प्राथम्याने येथील राहणीमान दर्जेदार होण्यासाठी प्रगत शहराच्या तोडीच्या मुलभूत सुविधा व रोजगार संधी उपलब्ध करुन देणे आवश्यक आहे. त्यामुळे पर्यावरण संतुलीत विकासाबरोबरच अशा मोठया ग्रामपंचायतीसाठी नगर रचना आराखडयाच्या धर्तीवर ग्रामविकास आराखडा तयार करुन जमीन वापराचे व बांधकामाचे निकष, जमीन विकासाचे निकष, झोनिंग व विकास नियंत्रण नियमावली आदी नियमन सुध्दा नियोजनबध्द विकासाचे दृष्टीने आवश्यक आहे. तसेच असा भौतिक विकास पर्यावरणप्रणित होण्यासाठी या मोठया ग्रामपंचायतींचा पर्यावरण विकास आराखडा करुन त्यानुसार विकास करणे आवश्यक आहे. त्यादृष्टीने अशा गावांचा स्वतंत्र विचार करुन समर्पक धोरण ठरविणे आवश्यक आहे.

**शासन निर्णय:-**

भू-व्यवस्थापन, जलव्यवस्थापन, सांडपाणी व्यवस्थापन, घनकचरा व्यवस्थापन, मनुष्यविष्ठा विल्हेवाट, वैयक्तीक स्वच्छता, उर्जा व्यवस्थापन, जमीनीचे धूप नियंत्रण, अंतर्गत ग्रामरस्ते विकास, गावातील इमारती व घरांचे पर्यावरणप्रणित बांधकाम, वृक्षारोपण, सामाजीक वनीकरण, उद्याने, पार्क, ग्रीन कव्हर इत्यादी विषयक प्रश्न सोडविण्यासाठी, विविध शासकीय विभागाचे काही कार्यक्रम / योजना स्वतंत्ररित्या सुरू आहेत. यात समन्वय साधून गावाचा एकात्मिक विकासाचा आराखडा बनवून, लोकांच्या सहभागातून विविध योजना एकात्मिक पद्धतीने सातत्यपूर्वक राबवून गावाच्या चिरस्थायी विकासासाठी पर्यावरण संतुलीत ग्रामविकासाची संकल्पना अंमलात आणण्यासाठी शासनाने **पर्यावरण संतुलित समृध्द ग्राम योजना** राबविण्याचा निर्णय घेतला आहे.

२. या योजनेची **उद्दिष्टे** पुढील प्रमाणे आहेत.

(१) पर्यावरण समतोल राखण्यासाठी उपलब्ध नैसर्गिक संसाधनाचा विकास करणे व त्यासाठी लोकसहभाग मिळविणे.

(२) पर्यावरणाचे भान ठेऊन भौतिक सुविधा उपलब्ध करणे व इको व्हिलेजची संकल्पना राबवून समृध्द ग्राम निर्माण करणे.

(३) यासाठी राज्य शासनाच्या विविध विभागाच्या ग्रामस्तरीय विविध योजनांची सांगड घालून योजनांचा समन्वय करणे व जेथे ही संकल्पना राबविण्यासाठी नव्या योजनांची, कार्यक्रमांची गरज आहे, ती पोकळी भरण्यासाठी तसे कार्यक्रम / योजना ग्रामविकास विभागामार्फत कार्यान्वित करणे.

(४) मोठया ग्रामपंचायतीचा पर्यावरण विकास आराखडा व ग्राम विकास आराखडा तयार करुन अशा मोठया गावात शहरी तोडीच्या सुविधा निर्माण करुन त्यांना **विकास केंद्रे** म्हणून विकसीत करणे.

**३.** पर्यावरण संतुलीत समृध्द गाव घडविण्यासाठी वृक्षारोपण व वृक्ष संवर्धन, जल व्यवस्थापन व जलस्त्रोत रक्षण, जमीन व्यवस्थापन, वन व्यवस्थापन, जैव विविधता संवर्धन, जलप्रदुषण रोखण्याच्या दृष्टीने अनुषंगीक बाबी व सांडपाणी व्यवस्थापन, घनकचरा व्यवस्थापन, अपारंपारिक ऊर्जा विकास कार्यक्रम, वैयक्तीक व परिसर स्वच्छता, मानवी व जनावराच्या विष्ठेचे व्यवस्थापन व त्यातून खत निर्मिती, सेंद्रीय शेती प्रोत्साहन व विकास, पर्यावरण संतुलीत बांधकाम वस्तुचा वापर, किमान प्रदुषण करणारे इंधन वापर, अन्न हाताळणी, पर्यावरणीय प्रणालीतून (इको फ्रेंडली सेटींग) क्रिडा विकास, बगिचा, तळे इत्यादींचे संरक्षण व संवर्धन इत्यादी घटकांचा प्रामुख्याने समावेश असेल. या घटकावर ग्रामपंचायतींनी भर दयावा व लोकसहभागावर आधारित सूक्ष्म नियोजन प्रकियेद्वारे ग्रामविकास कृती आराखडयात समाविष्ट करून या घटकांची अंमलबजावणी विविध योजनेच्या माध्यमातून करून पर्यावरण संतुलित गाव विकसीत करावे.

**४.** वरील घटक गावात राबविण्यासाठी शासनाच्या काही सध्याच्या योजना आहेत. मात्र विविध विभागाच्या योजनेतून काही प्रमाणात निधी उपलब्ध होत असला तरी सुध्दा त्या बाबीचे नियोजन व अंमलबजावणी गावपातळीवर करून, पर्यावरणाचे संतुलन केंद्रस्थानी ठेवून कृती करण्यासाठी आवश्यक तंत्रज्ञान, तज्ञ, माहिती, प्रशासकीय सहाय्य व काही प्रमाणात अतिरीक्त निधी स्वतंत्रपणे आवश्यक राहील. काही कार्यक्रमासाठी मुळात कार्यक्रम अथवा योजना नसेल वा निधी उपलब्ध नसेल व पर्यावरण संतुलीत विकासासाठी तो आवश्यक असेल तर या योजनेतून तो निधी गावांला पुढे नमूद सुधारणांचा अवलंब करून स्वकर्तृत्वावर प्राप्त होऊ शकेल.

**५.** या योजनेतंर्गत योजनेचे निकष पूर्ण करणाऱ्या ग्रामपंचायतींना सुरुवातीस तीन वर्षात खालील प्रमाणे निधी कामगिरीच्या सातत्यानुसार उपलब्ध करून देण्यात येईल.

(अ) **१०००० पेक्षा** जास्त लोकसंख्येच्या ग्रामपंचायतींना - प्रत्येकी **रु.३०** लाख (दरवर्षी १० लाख)

यापैकी तालुका मुख्यालयाच्या ठिकाणी असणाऱ्या ग्रामपंचायतींना - प्रत्येकी **रू. ३६** लाख (दरवर्षी १२ लाख)

(ब) **७००१ ते १००००** पर्यत लोकसंख्येच्या ग्रामपंचायतींना - प्रत्येकी **रु.२४** लाख (दरवर्षी ८ लाख)

(क) **५००१ ते ७०००** पर्यत लोकसंख्येच्या ग्रामपंचायतींना - प्रत्येकी **रु.१५** लाख (दरवर्षी ५ लाख)

(ड) **२००१ ते ५०००** पर्यत लोकसंख्येच्या ग्रामपंचायतींना - प्रत्येकी **रु.१२** लाख (दरवर्षी ४ लाख)

(इ) **१००१ ते २००० पर्यत** लोकसंख्येच्या ग्रामपंचायतींना - प्रत्येकी **रु.९** लाख (दरवर्षी ३ लाख)

(ई) **१०००पर्यंत** लोकसंख्येच्या ग्रामपंचायतींना - प्रत्येकी **रु.६** लाख (दरवर्षी २ लाख)

**६ (अ)** या पर्यावरण संतुलीत समृध्द ग्राम विकास योजनेतून प्राप्त निधी ग्रामपंचायतीने **मूलभूत सोईसुविधांच्या** भांडवली व व्यवस्थापकीय स्वरूपाच्या गुंतवणुकीकरीता वा तत्सम, अनुषंगीक कामा करीता साधारणतः खालील बाबीसाठी प्राधान्याने वापरावा.

१) रोपवाटिका व वृक्षसंवर्धन

२) गावातील घनकच-याचे शास्त्रीय तथा वाणिजिक व्यवस्थापन (मुख्यतः संकलन व प्रक्रिया, विविध जैवीक व पर्यावरण संतुलीत तंत्रज्ञानाचा वापर करून)

३) गावातील सांडपाण्याचे शास्त्रीय व पर्यावरण प्रवण व्यवस्थापन

४) जलनिःसारण गटारे ( Stormwater Drainage )

५) पंचायतीमधील सार्वजनिक रस्त्यावरील व स्थळावरील सौर पथदिवे, सार्वजनिक इमारतीत सौरउर्जा वापर व्यवस्था, सौरउर्जेद्वारे जल व्यवस्था व इतर सुविधांकरिता वापर.

६) इतर अपारंपारीक उर्जा विकास व वापर (पवन, जैवीक, बायोगॅस, इ.) जेणे करुन फॉसील फयुअल (खनिज तेल, कोळसा ) वापर कमी होईल.

७) दहन-दफन भूमी बांधकाम व त्यासाठी आवश्यक इतर सोईसुविधा पुरविणे, स्मृती उद्यान

८) ग्रामपंचायती अंतर्गत गावे व वाडयांना जोडणारे साकव व तत्सम बांधकाम, पांधण रस्त्यांचे बळकटीकरण व वृक्षारोपण.

९) उद्याने व बसथांबा

१०) राजीव गांधी भारत निर्माण ग्राम सुविधा केंद्र (६०:४० प्रमाणात राखतांना लागणारा अतिरीक्त निधी)

११) पर्यावरण संतुलीत विकासाकरीता इतर नाविन्यपूर्ण प्रकल्प.

१२) वरील प्रकल्पाचे नियोजन, अंमलबजावणी व संवर्धनाकरीता अनुषंगीक बाबी.

**६ (ब)**१०००० चे वरील लोकसंख्येच्या ग्रामपंचायतींना पर्यावरण संतुलित गांव योजनेतून **विकास केंद्र** म्हणून विकसित करण्यासाठी तसेच **पर्यावरण विकास आराखडा** व **ग्राम विकास आराखडा** तयार करण्यासाठी निधी व तंत्रसेवा उपलब्ध करुन घेण्यासाठी यातील निधी वापरता येईल. त्या आराखडयानुसार कृती कार्यक्रम आखून अंमलात आणावा. अशा ग्रामपंचायतींनी **विकास केंद्र** म्हणून विकसीत होण्यासाठी खालील अतिरीक्त कार्यक्रम घ्यावेत.

(१) जमीन विकास आराखडा व पर्यावरण विकास आराखडा तयार करणे.

(२) विकास आराखडयानुसार विविध सार्वजनिक कार्यालयांसाठी विकास व सुविधांसाठी जागा आरक्षित करणे, त्या ताब्यात घेणे, त्याचा सुनियोजन विकास करणे. यासाठी आवश्यक प्रशासकीय व तांत्रिक पाठबळ इतर

माध्यमातूनही देण्याचे प्रस्तावित आहे. तसेच या योजनेच्या प्राप्त निधीतून काही प्रमाणात ग्रामपंचायतीला तो उपलब्ध करुन घेता येईल. इतर योजनांशी त्यांची सांगड (Convergence) घालता येईल.

(३) सांडपाणी व्यवस्थापन - सांडपाणी प्रकिया प्रकल्प उभारणे. (विकेंद्रीत व केंद्रीत दोन्ही पध्दतीचे, त्यामध्ये जैविक तंत्रज्ञानाचा वापर पर्यावरण संतुलनाच्या दृष्टीने प्राधान्याने करावा.)

(४) सुलभ सार्वजनिक शौचालय - कायमस्वरुपी व फिरते शौचालये, त्यात ECO SAN स्वरुपाचा पर्यावरणधिष्टीत वापर अग्रक्रमाने करावा.

(५) पादचारी रस्ते, पक्के रस्ते, इतर अंतर्गत रस्ते तयार करणे (रस्त्यांचा दर्जा, वृक्ष लागवड याचा प्राधान्याने विचार करावा.)

(६) बाजारपेठ विकसीत करणे (बांधकामे व कचरा व्यवस्थापनसाठी, पर्यावरण संतुलीत, शाश्वत तंत्रज्ञानाचा प्राधान्याने वापर)

(७) गावातील रहिवाशी विभागाचा विकास करणे (नवीन गृह निर्माण वसाहतीची निर्मिती) - यासाठी ग्रामकेंद्रीत सुलभ पूरक धोरण स्वतंत्रपणे निश्चित करण्यात येईल.

(८) बागबगीचे, उद्याने, रोपवाटीका तयार करणे

**७.** या योजनेसाठी ग्रामपंचायतीच्या निवडीचे व अनुदानाचे निकष खालीलप्रमाणे राहतील :-

**(अ)** ग्रामपंचायत निवडीचे व **पहिल्या** वर्षीच्या अनुदान वाटपाचे निकष :-

या योजनेत सहभागी होणाऱ्या ग्रामपंचायतींनी प्रथम त्यांनी पर्यावरण संतुलीत ग्राम विकास साधण्याची तयारी सामूहिक कृतीतून दाखवून द्यावी लागेल. सबब या योजनेत सामील होऊन निधी वाटपासाठी गावाची तयारी म्हणून गावांनी सुरूवातीला खालील **किमान** निकष पूर्ण करणे आवश्यक राहील.

(१) पहिल्या वर्षी ग्रामपचांयतीच्या हद्दीत **लोकसंख्येच्या किमान ५०% झाडे** लावून जगविली पाहिजे. पुढे दोन वर्षात उर्वरित किमान ५०% आणखी झाडे लावून जगविणार असल्याची हमी ग्रामसभेने दिली पाहिजे.

(२) किमान **६०% हागणदारी मुक्त ग्रामपंचायत** (त्यानंतरच्या २ वर्षात गाव निर्मल करणे बंधनकारक राहील.)

(३) सर्व प्रकारची कर वसूली : ग्रामपंचायतींने **क्षेत्रफळावर आधारीत मालमत्ता कर आकारणी** तसेच सुधारित दराने **पाणीपट्टी** बसवून नजीकची फेरआकारणी नियमाप्रमाणे केली असल्यास व त्यानुसार किमान **६०%** थकबाकीसह कर वसूली करणे आवश्यक आहे.

(४) गावात शासनाच्या प्रचलित नियमानुसार म्हणजे **५० मायक्रॉनपेक्षा** कमी जाडी असणाऱ्या प्लास्टीक पिशव्यांवर बंदी करावी. तसेच विविध उत्सवातील मूर्तीचे विसर्जन करताना पर्यावरण प्रदूषणाच्या दृष्टीने उपाययोजना करण्याचा ठराव करून त्याची पुढील लगतच्या वर्षापासून अंमलबजावणी करावी.

(५) **संत गाडगेबाबा ग्राम स्वच्छता अभियानात भाग घेतला** पाहिजे व अभियानाची प्रभावी अंमलबजावणी करण्याची हमी दिली पाहीजे व त्याप्रमाणे लगतच्या पुढील वर्षापासून ती कृतीत आणली पाहिजे.

(६) **यशवंत पंचायत राज अभियानात** भाग घेण्याची हमी दिली पाहीजे व त्याप्रमाणे लगतच्या पुढील वर्षापासून ती कृतीत आणली पाहिजे.

वरील निकष पुर्ण करणाऱ्या ग्रामपंचायतींना योजनेतील **पहिल्या वर्षीचे** अनुदान देण्यात येईल.

**(ब) दुसऱ्या** वर्षीचे अनुदान हे खालील निकषानुसार देण्यात येईल :-

(१) या वर्षातील एकूण अनुदानाच्या ५०% अनुदान हे पुर्वीच्या वर्षात लावलेली झाडे जगल्याच्या प्रमाणा नुसार राहिल, परंतु **किमान २५% पेक्षा जास्त झाडे जगल्यासच** टक्केवारीच्या प्रमाणात अनुदान देण्यात येईल. गावातील कुटुंबाइतकी झाडे पहिल्या वर्षी लावली नसल्यास उर्वरीत ५०% झाडे दुसऱ्या वर्षात लावावीत.

(२) दुसऱ्या वर्षाचे उर्वरित ५०% अनुदान खालील निकष पुर्ण केल्यानंतर देण्यात येईल.

१) **७५%** हागणदारी मुक्त ग्रामपंचायत

२) सर्व प्रकारची कर वसूली, ग्रामपंचायतीने मालमत्ता कर क्षेत्रफळावर आधारीत कर आकारणी करून व सुधारित दराने पाणीपट्टी बसविणे, नजीकची फेरआकारणी नियमाप्रमाणे केली असल्यास व त्यानुसार **८०%** थकबाकीसह कर वसूली करणे आवश्यक आहे.

३) गावात शासनाच्या प्रचलित नियमानुसार म्हणजे **५० मायक्रॉनपेक्षा** कमी जाडी असणाऱ्या प्लास्टीक पिशव्यांवर बंदी कायम ठेवून सातत्य राखले पाहिजे. तसेच विविध उत्सवातील मूर्तीचे विसर्जन करताना पर्यावरण प्रदूषणाच्या दृष्टीने उपाययोजना करण्याची प्रत्यक्ष अंमलबजावणी सुरू केली पाहिजे.

४) संतगाडगेबाबा ग्रामस्वच्छता अभियानात जिल्हा परिषद मतदारसंघ स्तरीय किंवा त्यावरील तपासणीत **किमान ५०%** गुण मिळाले पाहीजेत.

५) लोकाभिमुख उत्तम शासनासाठी यशवंत पंचायत राज अभियानात **किमान ५०%** गुण मिळाले पाहीजेत.

६) अपांरपारिक उर्जामध्ये **५०% स्ट्रीट लाईट** (सौर ऊर्जा/ CFL/LED) बसविणे व **किमान १०%** कुटूबांकडे बायोगॅस वापर असावा.

७) घन कचरा व्यवस्थापन अंतर्गत **१००% कचरा** संकलन व किमान **५०%** कचऱ्यापासून खत निर्मीती करावी किंवा लॅन्डफील पध्दतीने विल्हेवाटीची व्यवस्था करावी.

८) सांडपाणी व्यवस्थापन अंतर्गत किमान **५०%** व्यवस्था करून त्यासाठीची कामे करावीत.

**(क) तिसऱ्या** वर्षीचे अनुदान हे खालील निकषानुसार देण्यात येईल :-

(१) तिसऱ्या वर्षाच्या एकूण अनुदानाच्या ५०% अनुदान हे पुर्वी लावलेली झाडे जगल्याच्या प्रमाणानुसार राहील. परंतु ५०% पेक्षा जास्त झाडे जगल्यासच टक्केवारीच्या प्रमाणात अनुदान देण्यात येईल.

(२) उर्वरीत ५०% अनुदान हे खालील निकष पुर्ततानुसार देण्यात येईल.

(१) १००% हागणदारी मुक्त ग्रामपंचायत झाली असावी व निर्मलग्राम पुरस्कारासाठी राज्याने शिफारस केली असावी.

(२) सर्व प्रकारची कर वसूली, ग्रामपंचायतीने क्षेत्रफळावर आधारीत मालमत्ता कर आकारणी करून नजीकची फेरआकारणी नियमाप्रमाणे केली असल्यास व त्यानुसार **९०%** थकबाकीसह कर वसूली करणे आवश्यक आहे.

(३) गावात शासनाच्या प्रचलित नियमानुसार म्हणजे **५० मायक्रॉनपेक्षा** कमी जाडी असणाऱ्या प्लास्टीक पिशव्यांवर बंदी कायम ठेवली व अंमलबजावणी केली असावी. तसेच विविध उत्सवातील मूर्तीचे विसर्जन करताना पर्यावरण प्रदूषणाच्या दृष्टीने उपाययोजना सातत्याने अंमलात आणावी.

(४) संतगाडगेबाबा ग्रामस्वच्छता अभियानात जिल्हा परिषद मतदारसंघ स्तरीय किंवा त्यावरील तपासणीत किमान **६०%** गुण मिळाले पाहीजेत.

(५) यशवंत पंचायत राज अभियानात किमान **६०%** गुण मिळाले पाहिजेत.

(६) अपारंपारिक उर्जामध्ये **१००%** स्ट्रीट लाईट (Street Light) सोलर CFL/LED बसविणे किमान **२५%** कुटूबांकडे बायोगॅस वापर असणे, **१०%** कुटुंबाकडे सौरऊर्जा / CFL / LED चा वापर प्रत्यक्ष असावा.

(७) घन कचरा व्यवस्थापन अंतर्गत १००% शास्त्रशुध्द कचरा संकलन १००% कचऱ्यापासून खत निर्मीती किंवा लॅन्डफील विल्हेवाट किंवा तत्सम शास्त्रशुध्द व्यवस्थापन व्यवस्था.

(८) सांडपाणी व्यवस्थापन अंतर्गत **किमान ७५%** व्यवस्था व त्यानुसार काम.

वरील निकष व पूर्तता सोबतच्या **परिशिष्ट १** मध्ये एकत्रितपणे नमूद आहे.

८. पर्यावरण संतुलित ग्राम योजनेअंतर्गत मोठया ग्रामपंचायतींना **विकास केंद्र** (Growth Centre) म्हणून विकसित करण्यात येईल. पहिल्या टप्यात १०,००० पेक्षा जादा लोकसंख्येच्या ग्रामपंचायतींना लहान गावांपेक्षा जादा क्षमतेच्या व उच्च प्रतिच्या मूलभूत सेवा उपलब्ध करून द्याव्या लागतील. या गावांच्या निवडीसाठी वरील **परिच्छेद ७** मध्ये नमूद निकषासोबतच खालील **जादा निकष** आवश्यक असतील.

(१) **ग्राम आराखडा** तयार करून अंमलबजावणी करण्याची पहिल्या वर्षी हमी देणाऱ्या व त्यानंतर एका वर्षात तो तयार करणाऱ्या ग्रामपंचायती (यामध्ये ग्राम विकास आराखडा व नियोजन, जमीन विकास व वापर, विकास नियमावली, बांधकाम नियम अंमलबजावणी यांचा समावेश असेल)

(२) अशा गावांनी पहील्या वर्षी वरील **परिच्छेद ७ (अ)** मधील नमूद निकषानुसार पात्र होण्यासोबतच पुढील १ वर्षाचे आत **पर्यावरण विकास आराखडा** शास्त्रशुध्द पध्दतीने तयार करण्याची हमी देणे व तो करुन घेणे.

९. या योजनेत सहभागी होणाऱ्या ग्रामपंचायतींनी **परिच्छेद ७** व मोठया ग्रामपंचायतींनी **परिच्छेद ८** मधील निकष पूर्ण करून विहित नमून्यात दिनांक २ ऑक्टोंबर, २०१० च्या ग्रामसभेत मान्यता घेऊन प्रस्ताव गटविकास अधिकारी यांच्याकडे दिनांक १० ऑक्टोंबर, २०१० पर्यंत सादर करावेत, त्यासोबत खालील बाबींची पूर्तता करावयाची आहे.

(१) शासनाने दिलेल्या विहित नमुन्यात प्रस्ताव (यात वृक्षलागवड, हागणदारी मुक्त गाव, करवसुली व इतर निकषांची सद्यस्थिती) सादर करावा.

(२) गावातील विकास कामांबाबत ग्रामविकास कृती आराखडा (या योजनेतील निधी मिळाल्यानंतर कोणती कामे हाती घेणार, तसेच इतर योजनेतून हाती घ्यावयाची कामे यांची माहिती).

(३) ग्रामविकास कृती आराखडा तयार करण्यासाठी नियोजन आयोगाच्या मार्गदर्शक सूचना (२००८) नुसार लोकसहभागावर आधारीत पाच / सहा दिवशीय सूक्ष्मनियोजन प्रक्रियेचा अवलंब करावा.

(४) १०००० पेक्षा जास्त लोकसंख्येच्या ग्रामपंचायतींनी योजनेत सहभागी झाल्यानंतर एका वर्षात नगररचनेच्या धर्तीवर **विकास आराखडा व पर्यावरण आराखडा** बनविणार असल्याची हमी, व त्याबाबतचा कृतीकार्यक्रम.

१०. या कार्यक्रमाच्या प्राप्त निधीतून ग्रामपंचायतींनी वरील **परिच्छेद ६** मध्ये नमूद कामे हाती घ्यावीत. प्रथम यासाठीच्या इतर सध्य योजनांमधून निधी उपलब्ध करून मुलभूत सुविधा विकासावर अंमलबजावणी करतांना विशेष भर द्यावा. शक्य तेथे महाराष्ट्र ग्रामीण रोजगार हमी योजना (MREGS) या योजनेचा ग्राम पंचायतींनी जास्तीत जास्त वापर करावा. इतर योजनातून एखादया बाबीच्या अंमलबजावणीकरिता निधी प्राप्त न झाल्यास किंवा कमी पडल्यास तो या निधीतून खर्च करता येईल. **उदा.** एखाद्या कामास महाराष्ट्र ग्रामीण रोजगार योजनेतून ६०:४० प्रमाण राखताना काही निधी कमी पडत असेल तर या योजनेतून करावा त्याच प्रमाणे पर्यावरण संतुलीत बांधकामाच्या दृष्टीने विरोपन तंत्रज्ञानाचा वापर करावयाचा असेल किंवा त्यासाठी तज्ञ सहाय्य आवश्यक असेल किंवा पर्यावरण संतुलीत विशेष साहित्य बांधकामाची वेगळी व्यवस्था आवश्यक असल्यास व ते शासनाच्या प्रचलित योजनेतून उपलब्ध होऊ शकत नसल्यास असा खर्च या निधीतून प्राथम्याने करण्यात यावा.

११. योजनेच्या अंमलबजावणीसाठी **तपासणी व सनियत्रंणासाठी** खालील तपासणी व सनियत्रंण समिती स्थापन करण्यात येत आहे.

(१) गट/पंचायत समिती स्तरावर तपासणी व सनियत्रंण समिती सर्वसाधारण खालील प्रमाणे राहील.

१. सभापती पंचायत समिती- अध्यक्ष

२. उप सभापती पंचायत समिती- उपाध्यक्ष

३. जिल्हा परिषद सदस्य (दोन)
४. पंचायत समिती सदस्य (दोन)
} चार पैकी किमान १ महिला (मुख्य कार्यकारी अधिकारी निवडतील)

५. सरपंच (दोन ) ( एक महिला ) पैकी १ महिला मुख्य कार्यकारी अधिकारी निवडतील

६. तालूका रोपवन अधिकारी

७. क्षेत्रीय वनअधिकारी

८. बालविकास प्रकल्प अधिकारी

९. गटशिक्षण अधिकारी

१० .प्रदुषण नियंत्रण मंडळाचे प्रतिनिधी

११. गटविकास अधिकारी सदस्य सचिव

ग्रामपंचायतींनी या योजनेत सहभागी होण्यासाठी **परिच्छेद ७ व ९** मधील निकषांची पुर्तता केल्यानंतर आपला प्रस्ताव **परिच्छेद ११** प्रमाणे संबधित गट विकास अधिकारी पंचायत समिती यांच्याकडे सादर करतील. त्यानंतर वरील समिती कडून ग्रामपंचायतीने निश्चित केलेले निकष पाळले काय याची जिल्हा परिषद मतदार संघ निहाय समित्या करून तपासणी करण्यात येईल, व निकष पुर्ण करणारे प्रस्ताव मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषदेकडे गट विकास अधिकारी पाठवतील.

(२) जिल्हा परिषद स्तरावर तपासणी व सनियत्रंण समिती खालील प्रमाणे राहील.

१. अध्यक्ष जिल्हा परिषद- अध्यक्ष

२. सभापती कृषी व पशुसंवर्धन

३. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद

४. अतिरीक्त मुख्य कार्यकारी अधिकारी,

५. जिल्हा नगर रचनाकार

६. जिल्हा सामाजिक वनीकरण अधिकारी/ उपसंचालक, सामाजिक वनीकरण

७. उप वन संरक्षक

८.कृषी विकास अधिकारी

९. महाराष्ट्र प्रदुषण मंडळ /पर्यावरण विभागाचा प्रतिनिधी

१०. जिल्हा नियोजन अधिकारी

११.उपमुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रामपंचायत) सदस्य सचिव

या समितीने तालुक्याकडून आलेले प्रस्ताव शासनास पाठविण्यापूर्वी प्रस्तावांची तपासणी करतांना प्रस्तावांची संख्या लक्षात घेऊन रॅन्डम पध्दतीने लॉट काढून तपासावे. जिल्हयातील प्रस्ताव एकत्रित करुन मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद यांनी शासनास सादर करावेत.

(३) राज्यस्तरावर मा.मंत्री, ग्राम विकास यांच्या अध्यक्षतेखाली खालील प्रमाणे **सनियंत्रण समिती** राहील

१. मा.मंत्री, ग्राम विकास

२. मा. राज्यमंत्री, ग्रामविकास

३. प्रधान सचिव, नियोजन

४. प्रधान सचिव, पाणीपुरवठा व स्वच्छता

५. प्रधान सचिव, जलसंधारण

६. प्रधान सचिव, वने

७. सचिव, पर्यावरण

८. सचिव, अल्पसंख्यांक

९. प्रधान सचिव, अदिवासी विकास

१०. प्रधान सचिव, सामाजिक न्याय

११. संचालक, सामाजिक वनीकरण

१२. सचिव, ग्राम विकास सदस्य सचिव

१३. या क्षेत्रातील शासनाने नेमलेल्या तज्ञ व्यक्ती (शासकीय / अशासकीय)

राज्य समिती कडून विहीत निकष पूर्ण करणाऱ्या ग्रामपंचायतींना अनुदान मंजूर करण्यात येईल. समितीला आवश्यक वाटल्यास राज्यस्तरावर जिल्हा परिषदेने शिफारस केलेल्या गांवाना विभागीय आयुक्तांमार्फत अथवा राज्यस्तरावरून स्वतंत्र तज्ञ, सेवाभावी संस्था इत्यादींकडून रॅन्डम पध्दतीने तपासण्याची व्यवस्थाही करता येईल.

**१२. क्षमता बांधणी व जनजागृती :-**

**१)** योजनेची अंमलबजावणी करण्यासाठी राज्यस्तरापासून ते गावस्तरापर्यंत सर्वच स्तरावर क्षमता बांधणी व जनजागृती मोहिम हाती घेण्यात यावी. ग्रामस्तरावरील सरपंच, ग्रामपंचायत पदाधिकारी, ग्रामसेवक, अंगणवाडी सेविका, आरोग्य सेवक, शिक्षक इत्यादींसाठी तालुकास्तरावर कार्यशाळेचे आयोजन करावे, सदरील सदस्यांना पर्यावरण ग्राम व यातील तांत्रिक बाबी, लोकसहभाग यावर मार्गदर्शन करावे.

**२)** ग्राम विकास विभागामार्फत नियमितपणे यशदा, पुणे, ग्रामसेवक प्रशिक्षणकेंद्र, पंचायतराज प्रशिक्षण केंद्र व स्वयंसेवी संस्था यांच्यामार्फत आयोजित करण्यात येणाऱ्या ग्रामपंचायत पदाधिकारी व ग्रामसेवक यांच्या प्रशिक्षणात पर्यावरण संतुलित समृध्दग्राम या विषयावर भर राहील. ग्रामपंचायतीतील सदस्यांची क्षमता वृध्दीतून ग्रामपंचायतीची क्षमता वाढविण्यावर भर देण्यात येईल तसेच जिल्हा परिषद व पंचायत समिती पदाधिकारी यांच्या प्रशिक्षणात या विषयावर भर दिला जाईल.

**३)** जनजागृतीसाठी रेडीओ, दुरदर्शन तसेच वृत्तपत्रात जाहिराती देण्यात येतील जिल्हास्तरावर पोस्टर, घडीपत्रिका गावस्तरावर कलापथक, तसेच भिंतीवर म्हणी लिहिणे, गृहभेटी इत्यादी माध्यमातून मोठ्या प्रमाणात जनजागृती करावी. या योजनेच्या एकूण अर्थसंकल्पित शासन सहभाग निधीच्या २ टक्के निधी प्रचार प्रसिध्दी व व्यवस्थापन यासाठी राज्यस्तरावर तरतूद उपलब्ध करुन देण्यात येईल.

**४)** प्रत्येक पंचायत समिती क्षेत्रात, शक्यतो १०००० लोकसंख्येच्या वरील ग्रामपंचायत आणि तालुका मुख्यालयी अशी ग्रामपंचायत असल्यास तिला प्राधान्य देवून, अशी ग्रामपंचायत **आदर्श पर्यावरण संतुलित समृध्दी ग्राम** म्हणून विकसीत करण्यासाठी निवडून, अशा ग्रामपंचायतीची जबाबदारी, विशेष अधिकारी / शासकीय प्राधिकरण / सेवाभावी संस्था / सामाजिक जबाबदारी घेणारे प्रगतशील उद्योजक / लोकप्रतिनिधी यांनी पुढाकार घेवून " ग्रामदत्तक उपअभियान " स्वरूपात अशा ग्रामपंचायतींना कृतीशील मार्गदर्शन करून ती ग्रामपंचायत इतर ग्रामपंचायती करीता ज्ञानवर्धन केंद्रे (Knowledge Centre) म्हणून विकसीत करण्यावर भर देण्यात येईल.

**१३. अंमलबजावणी :-**

१) या योजनेची गावपातळीवर अमंलबजावणी ग्रामपंचायती मार्फत होणार आहे. निकष पूर्ण केल्यानंतर तपासणीनंतर ग्रामपंचायतीस या योजनेतंर्गत निधी प्राप्त होईल. हा निधी ग्रामपंचायतीने स्वतंत्र खात्यामध्ये जमा करावयाचा आहे. याचे नियमित लेखा परिक्षण होईल याशिवाय **सामाजिक लेखा परिक्षण** (Social Audit) ग्रामपंचायतीचे स्तरावर होणार आहे.

२) योजनेच्या अंमलबजावणीसाठी शासनाने विहीत केलेली अर्हता व अनुभव असणाऱ्या व त्यानुसार तयार केलेल्या पॅनेलवरील नामांकीत सेवाभावी संस्था अथवा बाहेरील पर्यावरण, पायाभूत सुविधा तज्ञांची मदत घेता येईल. ग्रामपंचायतींना ग्राम आराखडा व पर्यावरण विकास आराखडा करण्यास सहकार्य आणि इतर मार्गदर्शन व अंमलबजावणीसाठी तांत्रीक सल्लागारांचे स्वतंत्र पॅनल तयार करण्यात येईल. त्या योगे ग्रामपंचायतींना वरील योजना राबवितांना समर्पक तंत्रज्ञान, (Appropriate Technology) तांत्रीक माहिती व मार्गदर्शन मिळू शकेल ग्रामपंचायती त्यांचे गरजेनुसार तांत्रिक, संगणक, पर्यावरण, लेखा, समाजसेवा तज्ञ यांच्या सेवा कन्सलटंसी/कंत्राटी पध्दतीने अल्पकाळाकरीता प्राप्त करुन घेऊ शकतील. १३ वा वित्त आयोग, बीआरजीएफ आदी तत्सम योजनातून यासाठी आर्थिक तरतूद करुन त्याचा वापरही, सक्षम प्राधिकाऱ्याची मंजूरी घेऊन एकात्मिकरित्या (Convergence) करता येईल. यासाठी ग्रामविकास विभाग आवश्यक प्रक्रिया निश्चित करून देईल.

३) गावांना योजनेत प्राप्त निधीतून **५ टक्के पर्यंत** खर्च तज्ञसेवा, प्रशासकीय व्यवस्था व अंमलबजावणी प्रक्रियेकरीता करता येईल.

**१४. राज्यस्तरीय सनियंत्रण व तांत्रिक सहाय्य गट :-**

राज्य स्तरावर तांत्रिक ज्ञान/सहकार्य व सनियंत्रण करण्यासाठी ग्रामविकास, कृषी, पर्यावरण क्षेत्रातील तज्ञांचे गट तयार करण्यात येतील. योजनेचे स्वतंत्र मुल्यांकन दरवर्षी करण्यात येईल.

**१५.** या योजनेच्या अंमलबजावणीत जी गावे नाविन्यपूर्ण उपक्रम राबवितील व ज्यातून विज्ञान, तंत्रज्ञान व्यवस्थापकीय व लोकसहभागीय अशा आदर्शकृती (Innovative Practices) इतर गावांना पर्यावरण संतुलीत ग्राम विकासाकरिता प्रत्यक्ष राबविण्यास प्रमाणभूत व सहाय्यभूत ठरतील त्यांचे संकलन करण्यात येईल व अशा गावांसाठी प्रोत्साहनपर व गौरवपर पारितोषिक योजना राबविण्यात येईल. आदर्श कृतीची ( Best Practices) माहिती होण्यासाठी अभियानातील यशस्वी गावांना इतर ग्रामपंचायत पदाधिकारी / अधिकारी यांच्या **अदानप्रदान भेटी** आयोजीत करण्यात येतील.

**१६.** तीन वर्षानंतर योजनेचा आढावा घेवून ती पुढे सुरू ठेवण्याबाबत राज्यस्तरीय समिती निर्णय घेईल.

हा शासन निर्णय शासनाच्या **www.maharashtra.gov.in** या संकेत स्थळावर उपलब्ध असून त्याचा संगणकीय संकेतांक **२०१००८१८२०५३४९००१** असा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने ,

**(सुधीर ठाकरे)**
**सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रति,**

१. माननीय राज्यपालांचे सचिव,
२. मा.मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव,
३. मा.उपमुख्यमंत्री यांचे सचिव,
४. मा.मंत्री व राज्यमंत्री (सर्व) यांचे खाजगी सचिव,
५. मा.मुख्य सचिव,
६. सर्व मंत्रालयीन विभाग,
७. सर्व विभागीय आयुक्त,
८. सर्व जिल्हाधिकारी,
९. महालेखापाल, महराष्ट्र-१, मुंबई (लेखा व अनुज्ञेयता),
१०. महालेखापाल, महाराष्ट्र-२, नागपूर (लेखा व परिक्षा व अनुज्ञेयता),
११. संचालक, लेखा व कोषागारे, मुंबई,
१२. ग्राम विकास विभागातील सर्व उप सचिव,
१३. सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी, (गट विकास अधिकारी, पंचायत समिती यांच्या प्रतिसह)
१४. सर्व मुख्य लेखा व वित्त अधिकारी, जिल्हा परिषद,
१५. संचालक, भाषा संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई,
१६. महासंचालक, माहिती व जनसंपर्क महासंचलनालय, मंत्रालय, मुंबई (प्रसिध्दीसाठी)
१७. ग्राम विकास विभागातील सर्व कार्यासने व रोखशाखा,
**१८.** निवड नस्ती, कार्यासन पं.रा.-४ (२२), ग्राम विकास व जलसंधारण विभाग.